## Section – 06
## Scholarship Information

**भारत सरकार शिष्यवृत्ती संबंधी नियमावली व सुचना**

१) ज्या विद्यार्थ्यांजवळ जातीचे प्रमाणपत्र आहे त्यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती मिळते अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन आवदेन पत्र भरून महाविद्यालयात दिनांक ३१ ऑगस्ट पर्यंत जमा करावे.

२) ऑनलाईन आवदेनपत्र भरून त्यावर पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा. जातीचा उल्लेख करतांना त्यात आपली शाळा सोडल्याचा दाखल्यावर अथवा जातीच्या प्रमाणपत्रावर असलेलीच जात लिहावी. (ओ.बी.सी., ए.सी., असे लिहु नये)

३) आवदेनपत्र १) शाळा सोडल्याचा दाखला, २) मार्कशिट, ३) जातीचा दाखला, ४) उत्पन्नाचा दाखला, ५) दुसया शाळेतुन विद्यार्थी या महाविद्यालयात प्रवेश घेत असेल तर त्या शाळेत शिष्यवृत्ती मिळल्याचा मंजुरात क्रमांक प्रमाणपत्र, जिल्हयाबाहेरचा असल्यास जिल्हयाबदली प्रमाणपत्र जोडावे, ६) दहावीची गुणपत्रिका, ७) आधारकार्ड झेरॉक्स

४) शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना महाविद्यालयात नियमित हजर राहणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांची ७५% पेक्षा कमी हजेरी असेल व जे विद्यार्थी परीक्षा फार्म भरणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही. त्याच्या मंजुर निर्वाह भत्त्याची रक्कम त्याला मिळणार नाही. त्या विद्यार्थ्यांच्या अनुपस्थीती बद्दल जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना कळविण्यात येईल.

५) प्रवेश घेतांना सवलत धारक विद्यार्थ्यांचे उत्पन्नाचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र व मागील वर्षी शिष्यवृत्ती घेतल्याचा आदेश क्रमांक व आधार कार्ड झेरॉक्स देणे अनिवार्य राहील. अन्यथा पूर्ण फी भरावी लागेल.

६) उत्पन्नाचा दाखला वडीलांच्या नावाचाच असावा. ज्यांना वडील नाही, मयत झालेले असतील तर वडीलांच्या मृत्युचा दाखला व उत्पन्नाचा दाखला आईच्या नावाचा चालेल. परंतु ज्या वेळेस आई, वडील दोघे मृत्यु पावलेले असतील तर दोघांचा मृत्युचा दाखला व रक्ताच्या नात्याच्या व्यक्तीचा उत्पन्नाचा दाखला चालेल. सोबत तहसिलदार यांचे प्रमाणित प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

७) उत्पन्नाचा दाखला तहसिलदाराने साक्षांकित केलेला असावा.

८) शिष्यवृत्तीचे आवदेनपत्र भरण्याची पुर्ण जबाबदारी ही विद्यार्थ्यांची राहील तो/ती भरण्यास असमर्थ ठरल्यास महाविद्यालयाची पुर्ण फी भरावी लागेल. त्याला महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

९) बँक खात्याला आधार लिंक केल्याची पावती महाविलयात जमा करणे अनिवार्य आहे.

**टिपः जे विद्यार्थी ई.बी.सी. फॉर्म किंवा शिष्यवृत्ती फॉर्म भरणार नाहीत, त्यांना महाविद्यालयाची संपूर्ण वर्षाची पूर्ण फी भरावी लागेल.**